क्र. १४४ पहिले वर्ष

# रविवारची उपासना

१४ मे २०२३

## पुनरुत्थानानंतरचा सहावा रविवार

### प्रस्तावना

आजच्या शुभवर्तमानात प्रभू येशू म्हणतो, ‘‘जशी पित्याने माझ्यावर प्रीती केली, तशी मीही तुम्हांवर प्रीती केली आहे. तुम्ही माझ्या प्रीतीत राहा.’’ ख्रिस्ती जीवनाचा पाया परमेश्वराच्या प्रेमावर उभारलेला आहे. कारण देव प्रेमस्वरुप आहे म्हणून त्याने आपल्या तारणासाठी त्याचा एकुलता एक पुत्र या जगात पाठविला. ईश्वरप्रीतीचा व परस्परप्रीतीचा संदेश आपल्या शिकवणुकीद्वारे दिला. ख्रिस्ताच्या प्रीतीत राहणे म्हणजे त्याच्या दैवी कृपेचा व प्रेमाचा अनुभव घेऊन आपल्या कृतीद्वारे स्वर्गीय सुखाचे वाटेकरी होणे होय. आपण स्वत:साठी जगत असताना ख्रिस्ताप्रमाणे इतरांचे जीवन प्रेमाने फुलविण्यास पवित्र आत्म्याची प्रेरणा आपणांस मिळावी म्हणून ह्या पवित्र मिस्साबलीत प्रार्थना करूया.

### प्रास्ताविक प्रार्थना

**आपण प्रार्थना करूया**

नित्यजिवी परमेश्वरा, प्रभूच्या पुनरुत्थानाचा विधी आनंदाने साजरा करण्यास आम्हाला साहाय्य कर. या प्रेमसंस्काराला अनुसरुन आचरण करण्यास आम्हाला समर्थ कर. ही प्रार्थना आम्ही, तुझ्याबरोबर पवित्र आत्म्याच्या ऐक्यात सर्वकाळ जिवंत राहणारा व राज्य करणारा, एकच परमेश्वर, तुझा पुत्र, आमचा प्रभू येशू ख्रिस्त ह्याच्याद्वारे करतो

**प्रभूशब्द विधी**

### पहिले वाचन

**प्रेषितांची कृत्ये या पुस्तकातून घेतलेले वाचन**

८:५-८, १४-१७

**‘‘त्यांनी त्यांच्यावर आपले हात ठेवले आणि त्यांना पवित्र आत्मा मिळाला.’’**

फिलिप्पने शोमरोन शहरी जाऊन तेथील लोकांपुढे ख्रिस्ताची घोषणा केली. तेव्हा फिलिप्पचे भाषण ऐकून आणि तो करीत असलेली चिन्हे पाहून लोकसमुदायांनी त्याने सांगितलेल्या गोष्टींकडे एकमनाने लक्ष दिले. कारण ज्यांच्यामध्ये अशुध्द आत्म्यांनी संचार केला होता, त्यांच्यातील पुष्कळातून ते अशुध्द आत्मे मोठ्याने ओरडून निघून गेले. पुष्कळ पक्षघाती आणि पांगळी माणसे बरी झाली आणि त्या नगरात आनंदीआनंद झाला.

मग शोमरोनने देवाचे वचन स्वीकारले असे यरुशलेमेतल्या प्रेषितांनी ऐकून त्यांच्याकडे पेत्र आणि योहान यांना पाठवले. ते तेथे आल्यावर त्यांना त्यांस पवित्र आत्मा मिळावा म्हणून त्यांच्यासाठी प्रार्थना केली. कारण तोपर्यंत त्यांच्यापैकी कोणावरही तो उतरला नव्हता. प्रभू येशूच्या नावाने त्यांचा बाप्तिस्मा मात्र झाला होता. तेव्हा त्यांनी त्यांच्यावर आपले हात ठेवले आणि त्यांस पवित्र आत्मा मिळाला.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### प्रतिसाद स्तोत्र

६५:१-३, ४-५, ६-७,१६-२०

प्रतिसाद : **सर्व लोकहो, परमेश्वराचा जयजयकार करा.**

१. अहो, पृथ्वीवरील सर्व लोकहो, देवाचा जयजयकार करा, त्याच्या नामाचा महिमा गा. त्याची गौरवयुक्त स्तुती करा. देवाला म्हणा : तुझी कृत्ये किती महान आहेत!

२. पृथ्वीवरील सर्व लोक तुला नमतील आणि तुझी स्तोत्रे गातील, तुझ्या नामाची स्तोत्रे गातील! अहो या, देवाची कृत्ये पाहा, मानवांमध्ये त्याची कृत्ये महान आहेत.

३. त्याने समुद्राची कोरडी भूमी केली. ते नदीतून कोरड्या पायांनी पार गेले. आम्ही त्याच्या
ठायी हर्ष पाहू या. तो आपल्या सामर्थ्याने सर्वकाळ सत्ता चालवतो.

४. अहो देवाचे भय धरणारे सर्व जनहो, तुम्ही या, ऐका. त्याने माझ्या जीवासाठी जे केले आहे ते मी सांगतो. देवाचा धन्यवाद होवो. त्याने माझी प्रार्थना अवमानली नाही. आपले माझ्यावरचे प्रेम त्याने काढून घेतले नाही.

### दुसरे वाचन

**पेत्रचे पहिले पत्र यातून घेतलेले वाचन**

३:१५-१८

**‘‘येशू ख्रिस्त देहरुपात जिवे मारला गेला आणि आत्म्यात जिवंत झाला.’’**

आपल्या अंत:करणात ख्रिस्ताचा प्रभू म्हणून आदर करा. तुमच्याठायी असलेल्या आशेविषयी विचारपूस करणाऱ्या प्रत्येकाला उत्तर देण्यास नेहमी सिध्द असा. ते सौम्यतेने आणि भीडस्तपणे द्या. ते सद्भाव धरून द्या. ह्यासाठी की, तुमच्याविरुध्द बोलणे चालले असता ख्रिस्तातील तुमच्या सद्वर्तनावर आक्षेप घेणाऱ्यांनी लज्जित व्हावे. कारण चांगले करुनही तुम्ही दु:ख सोसावे अशी देवाची इच्छा असली, तर वाईट करुन दु:ख सोसण्यापेक्षा ते बरे आहे. कारण आम्हांला देवाजवळ नेण्यासाठी ख्रिस्तानेही पापाबद्दल, म्हणजे नीतिमान पुरुषाने अनीतिमान लोकांकरिता, एकदा मरण सोसले. तो देहरुपात जिवे मारला गेला आणि आत्म्यात जिवंत केला गेला.

**हा प्रभूचा शब्द आहे.**

### जयघोष

**योहान १४:२३**

**आलेलुया, आलेलुया!**

येशूने म्हटले, ‘‘माझ्यावर प्रेम करणारा माझे वचन पाळील, माझा पिता त्याच्यावर प्रेम करील आणि आम्ही त्याच्याकडे येऊ.’’

**आलेलुया!**

### शुभवर्तमान

**योहानलिखित शुभवर्तमानातून घेतलेले वाचन**

**१४:१५-२१**

**"मी पित्याला विनंती करीन, मग तो तुम्हांला दुसरा कैवारी देईल."**

येशू आपल्या शिष्यांना म्हणाला, "माझ्यावर तुमची प्रीती असली तर तुम्ही माझ्या आज्ञा पाळाल. मी पित्याला विनंती करीन, मग तो तुम्हांला दुसरा कैवारी म्हणजे सत्याचा आत्मा देईल; त्याने तुम्हांबरोबर सदासर्वदा राहावे. जग त्याला ग्रहण करु शकत नाही, कारण ते त्याला पाहत नाही अथवा त्याला ओळखत नाही. तुम्ही त्याला ओळखता, कारण तो तुम्हांबरोबर राहतो आणि तुम्हांमध्ये वस्ती करील.

"मी तुम्हांला अनाथ असे सोडणार नाही. मी तुम्हाकडे येईन. आता थोडाच वेळ आहे, मग जग मला आणखी पाहणार नाही. पण तुम्ही मला पाहाल. मी जिवंत आहे म्हणून तुम्हीही जिवंत राहाल. त्या दिवशी तुम्हांला समजेल की, मी आपल्या पित्यामध्ये आहे आणि तुम्ही माझ्यामध्ये आणि मी तुम्हांमध्ये आहे. ज्याच्याजवळ माझ्या आज्ञा आहेत आणि जो त्या पाळतो तोच माझ्यावर प्रीती करणारा आहे आणि जो माझ्यावर प्रीती करतो त्याच्यावर माझा पिता प्रीती करील, मी त्याच्यावर प्रीती करीन आणि स्वत: त्याला प्रकट होईल."

**प्रभूचे हे शुभवर्तमान**

## श्रध्दावंतांच्या प्रार्थना

### प्रास्ताविक

माझ्या बंधुभगिनींनो, ख्रिस्ताच्या पुनरुत्थानाच्या आनंदासह आपण आपल्या परमेश्वरपित्याकडे प्रार्थना करू या. त्याच्या अतिप्रिय पुत्राच्या प्रार्थना त्याने ऐकल्या आणि स्वीकारल्या : तो आपल्या मागण्या पूर्ण करील असा आपण विश्वास बाळगू या.

आपला प्रतिसाद असेल - **ऐकावी प्रार्थना करितो मी याचना. (गायनात)**

१. आपले पोप, बिशप्स, धर्मगुरू, धर्मभगिनी व धर्मबंधू ह्यांना आपले सेवाकार्य करण्यास पवित्र आत्म्याचे दान मिळावे म्हणून आपण प्रार्थना करूया.

२. आपल्या धर्मग्रामात नि:स्वार्थी सेवा करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना आपले कार्य करण्यास पवित्र आत्म्याचे सामर्थ्य मिळावे म्हणून आपण प्रार्थना करूया,

३. आपल्या देशात भ्रष्टाचार, अत्याचार व अंदाधुंदी बोकाळत आहे. ह्या वाईट प्रवृत्ती आपल्या देशातून नष्ट व्हाव्यात म्हणून आपण प्रार्थना करूया.

४. शांती निर्माण करण्यासाठी व समेट घडवून आणण्यासाठी जगभर अनेक संघटना कार्यरत आहेत, पवित्र आत्म्याच्याद्वारे त्यांच्या कार्याला यश प्राप्त व्हावे म्हणून आपण प्रार्थना करूया.

५. आपल्या कौटुंबिक व वैयक्तिक हेतूंसाठी, आपण प्रार्थना करूया.

## समारोप

हे स्वर्गीय पित्या, तुझ्या लोकांच्या या जीवनातील अनेक गरजांची तुला जाणीव आहे. तुझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या सर्वांच्या प्रार्थना ऐक आणि त्यांचा स्वीकार कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभू ख्रिस्ताद्वारे करतो. आमेन.

## अर्पणावरील प्रार्थना

हे प्रभो, आमच्या प्रार्थनांचा व भेटींचा स्वीकार कर. आम्हाला तझ्या क्षमेचे वरदान दे आणि तुझे प्रेमसंस्कार स्वीकारण्यासाठी आम्हाला लायक कर. ही प्रार्थना आम्ही प्रभू येशूच्या नावाने करतो.

## प्रसादानंतर प्रार्थना

हे सर्वसमर्थ व नित्यजिवी परमेश्वरा, ख्रिस्ताला मरणातून उठवून तू आम्हाला जीवन मिळवून दिलेस. या पुनरुत्थानाच्या संस्काराने आम्हाला सबळ कर. ही प्रार्थना आम्ही आमच्या प्रभूख्रिस्ताद्वारे करतो.

## चिंतन

पुनरुत्थानकाळातील श्रध्देचा प्रवास ही पवित्र आत्म्याठायी नवजीवन जगण्यासाठी देण्यात आलेली संधी असते. तीन पातळींवर ह्या संधीचा लाभ घेण्यास वाव असतो :

**अ) नवीन जीवनपध्दती :** बाबिलोनच्या हद्दपारीतून परतलेल्या इस्राएली लोकांमध्ये यहुदी आणि शोमरोनी असे दोन गट पडले. मंदिर उभारणीच्या काळात त्यांच्यातील दरी रूंदावली. येशूच्या काळापर्यंत दोन्ही समाजात परस्परांविषयी आकस होता. प्रारंभीच्या ख्रिस्तसभेत निवडण्यात आलेल्या सात डिकन्सपैकी फिलिप हा डीकन शोमरोनात जातो. आजच्या पहिल्या वाचनात (प्रे.कृ.८:५-८) फिलिपच्या प्रेषितकार्याचे वर्णन करण्यात आलेले आहे. त्यानंतर लोकांच्या जीवनपध्दतीत आमूलाग्र बदल घडून आला.

**ब) नवीन सहनशीलता :** आजच्या दुसऱ्या वाचनात (१ पेत्र३:१५-१८) पेत्र आपल्या श्रध्दावंतांना छळाला सामोरे जाण्यासाठी धैर्य देतो. छळाच्या पार्श्वभूमीवर ख्रिस्ती श्रध्दा सोडून देणे यापेक्षा दु:खसहन करून सार्वकालिक जीवन प्राप्त करून घेणे चांगले असे तो त्यांना सुचवितो. मात्र त्यासाठी नवीन सहनशीलता आत्मसात करण्याची गरज आहे हे ते ठासून सांगतो.

**क) नवीन आज्ञाधारकवृत्ती :** आपल्या शुभवर्तमानात (योहान १४:१५-२१) प्रभू येशू आपल्या प्रेषितांना पवित्र आत्म्याचे दान देण्याचे अभिवचन देतो. परमेश्वराच्या आज्ञा पाळणे आणि परस्परांवर प्रेम करणे ही पवित्र आत्म्याठायी नवजीवनाची बाह्य चिन्हे होत. त्यासाठी नवीन प्रकारची आज्ञाधारकवृत्ती त्यांनी धारण करावी असे येशू त्यांना शिकवितो.

**आत्मपरीक्षण :** पवित्र आत्म्याठायी नवजीवन जगण्यासाठी मला माझ्या जीवनपध्दतीत, सहनशीलतेत व आज्ञाधारकपणात अजून कोणकोणते बदल करावे लागणार आहेत? ●●●

| मे २०२३ | दैनंदिन बायबल वाचने | दुसरा सप्ताह |
|---|---|---|
| सोम १५ | सं इसिडोर (पां) | : प्रे.कृ. १६:११-१५/योहान १५:२३-१६:४ |
| मंगळ १६ | सं सायमन स्टॉक (पां) | : प्रे.कृ.१६:२२-३४/योहान १६:५-११ |
| बुध १७ | सं पास्काल बेलॉन (पां) | : प्रे.कृ. १७:१५,२२-१८:१/योहान १६:१२-१५ |
| गुरू १८ | सं जॉन पहिले (पां) | : प्रे.कृ.१८:१-८/योहान १६:१६-२० |
| शुक्र १९ | सं पीटर सेलेस्तीन पाचवे (पां) | : प्रे.कृ.१७:१-१८/योहान १६:२०-२३ |
| शनि २० | सिएनाचा सं बर्नाडिन (पां) | : प्रे.कृ.१८:२३-२८/योहान १६:२३-२८ |